I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 132-135
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# आत्मनिर्भर भारत : संधी आणि आव्हाने

प्रा. अरविंद ढोके[१] व प्रा. डॉ. प्रकाश तितरे[२]

[१]इतिहास विभाग प्रमुख
आनंद निकेतन कॉलेज, आनंदवन, वरोरा, जि. चंद्रपूर
[२]अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
विवेकानंद कला व वाणिज्य महाविद्यालय, भद्रावती, जि. चंद्रपूर
Corresponding Author : arvinddhoke@gmail.com, titre-prakash@gmail.com

Communicated :17.03.2022 | Revision : 27.03.2022 Accepted : 30.03.2022 | Published: 02.05.2022

**सारांश :**

आत्मनिर्भर भारत हा आता फक्त घोषवाक्य नसून राष्ट्रीय संकल्प आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे देशांतर्गत उद्योगाला चालना देण्यासाठी मानसिकता व धोरणात्मक चौकट बदलणे हे अत्यंत आवश्यक आहे.

भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता व आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्याकरिता भारताचा ग्रामीण विकास, महिलांचे सक्षमीकरण, विविध शासकीय योजना चा परामर्श, भारतीय अर्थव्यवस्थेवर बवअपक–१९ चे झालेले परिणाम असे अनेक विषयाच्या संदर्भात देशातील सामाजिक व आर्थिक नवकल्पना जाणून घेण्यास मदत मदत होईल व भारताला आत्मनिर्भर होण्याकरिता मदत करता येईल असे वाटते.

आज या विषयाचे महत्त्व बवअपक–१९ च्या महामारीच्या काळात अतिशय जास्त आहे कारण या महामारी मुळे देशासमोर अनेक प्रश्न किंवा समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या सोडविण्याकरिता भारत सरकार तसेच राज्य सरकार प्रयत्न करीत आहेत परंतु जी मनुष्यहानी झालेले आहे ती भरून निघणार नाही. त्यामुळे अत्यावश्यक सामाना करिता किंवा अन्नधान्य करिता आपण दुसऱ्या देशांवर अवलंबून राहणे उचित होणार नाही. या उद्देशाने १२ मे २०२० ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत ही संकल्पना देशासमोर मांडली. ती पूर्ण करण्याकरिता भारतीय अर्थव्यवस्थेत तेव्हापासून मोठी गुंतवणूक करण्याच्या उद्देशाने व विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने २० लाख कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे.

अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान चलित प्रणाली, दोलायमान लोकसंख्याशास्त्र आणि मागणी या पाच पिल्लर वर आत्मनिर्भरतेचे प्रयत्न अवलंबून असतील असे स्पष्ट करण्यात आले.

हे सर्व लक्षात घेता संशोधकाने "आत्मनिर्भर भारत : संधी आणि आव्हाने" या विषयाची निवड केली आहे. या शोधनिबंधात आत्मनिर्भर भारताकरिता भारतात असलेल्या संधी जसे भारतीय संविधान व त्यातील तरतुदी, युवाशक्ती, नैसर्गिक संसाधने, सांस्कृतिक धरोहर, मानवी भांडवल, पर्यटन व्यवसाय, भारतीय बाजारपेठ इत्यादीबाबत चर्चा करण्यात आली आहे. तसेच आत्मनिर्भर भारत होण्याकरिता भारता समोर आव्हाने आहेत जसे भांडवल निर्मिती चा दर कमी, निम्न प्रतीचे मानवी भांडवल, तांत्रिक प्रगती व नवप्रवर्तन याची कमी, उद्योजकता व उपक्रमशीलता याची उदासीनता, राष्ट्रीय चारित्र्याचा अभाव, आर्थिक व सामाजिक विषमता.

**बीजशब्द :** आत्मनिर्भर, नवप्रवर्तन, भांडवलनिर्मिती, राष्ट्रीय चारित्र्य, सक्षमीकरण.

**प्रस्तावना :**

भारतातील कला व संस्कृती लक्षात घेतल्यास भारत प्राचीन काळात आत्मनिर्भर होता असे दिसून येते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत आत्मनिर्भर बनावा असे भारतवासीयांना वाटत होते. महात्मा गांधी असे म्हणायचे की लोकांनी संपूर्णपणे स्वदेशी वस्तू वापराव्यात. आपल्या देशातील नैसर्गिक संसाधन व कच्चामाल वापरून तयार होणाऱ्या वस्तूचे प्रयोग ते करीत असत. हे आत्मनिर्भर भारता करिता स्वातंत्र्यानंतर पहिले पाऊल होते असे म्हणता येईल. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की स्वातंत्र्यानंतर सत्तर वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असला तरी आपण स्वयंपूर्ण होऊ शकलो नाही. Covid–19 महामारी च्या संकटात देशात अन्नधान्य व अन्य आवश्यक सामानाची टंचाई दिसून येत आहे. वैद्यकीय क्षेत्रावर आलेला ताण, आवश्यक औषधे, व्हेंटीलेटर्स, ऑक्सिजन यांचा झालेला तुटवडा यामुळे मोठी मनुष्यहानी झालेली आहे.

Covid–19 च्या महामारी मुळे आंतरराष्ट्रीय व्यापार मर्यादित झालेले आहे. त्यामुळे जे देश विदेशी व्यापारावर अवलंबून होते त्यांना मात्र मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागत आहे. भारतालाही आयाती बद्दल मोठ्या अडचणी सहन कराव्या लागत आहे. त्यामुळे भारताचे पीएम नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारत हा संकल्प केलेला आहे.

त्यादृष्टीने भारतीय अर्थव्यवस्थेत मूलभूत सुधारणा करण्याचे ठरविले आहे.

**आत्मनिर्भर भारत : संधी (अपॉर्च्युनिटी)**

आपल्या देशात विविधता आहे. देशात विविध प्रकारची संस्कृती, रहानसहन, खानपान, आणि भाषा, रितीरिवाज असलेले दिसून येते. नैसर्गिक संसाधने, जैवविविधता आणि वन याबाबत संपन्नता तर आहेच त्याचबरोबर विविधता सुद्धा आहे. निसर्गाने जे आपल्याला दिलेले आहे ती संसाधने मोठ्या प्रमाणात भारतात उपलब्ध आहेत. आपण या साधनांचा वापर करून भारताला आत्मनिर्भर बनता येईल.

परंतु भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता सर्वांनी एकत्र येऊन सामूहिक प्रयत्न करण्याची गरज आहे. तरच भारत आत्मनिर्भर होऊ शकेल. भारत आत्मनिर्भर होण्याकरिता खालील संधी भारताजवळ आहेत.

१. **भारतीय संविधान** : सर्वात चांगली गोष्ट म्हणजे आपल्या देशातील संविधान आपल्या देशाला आत्मनिर्भर होण्याकरिता पूर्णता सहाय्य करेल असे वाटते. भारतीय संविधान भारतातील प्रत्येक नागरिकाला जगण्याचा, शिक्षण घेण्याचा, रोजगार मिळविण्याचा, विचारांची अभिव्यक्तीचा व सर्व बाबतीत समानतेचा अवसर प्रदान करते. देशातील जनकल्याणाच्या योजनाचा लाभ देशातील सर्व नागरिक घेत असतात. भारतीय संविधान प्रत्येक नागरिक स्वतंत्रता पूर्वक देशातील कुठल्याही क्षेत्रात जाऊन रोजीरोटी मिळू शकतो किंवा नवीन उद्योग धंदा स्थापित करू शकतो ही गोष्ट राष्ट्राला आत्मनिर्भर बनविण्याकरिता सर्वात महत्वाची आहे.

२. **युवाशक्ती** : भारत युवकांचा देश आहे असे आपण म्हणतो. जवळजवळ ५०: युवा लोकसंख्या आहे. आपल्या देशातील युवा भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता अहम योगदान देऊ शकतात. भारतातील युवाशक्ती प्रतिभावान असून संपूर्ण जगात भारतीय युवकांची प्रशंसा केली जाते. अनेक देशाच्या विकासात भारतीय युवकांचे योगदान आहे. भारतात स्टार्टअप योजनेअंतर्गत युवकांना प्रेरित करीत आहेत. प्रोत्साहन देत आहेत त्यामुळे भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता वाटचाल सुरू केलेली आहे असे दिसून येते.

३. **नैसर्गिक संसाधन** : भारतात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक संसाधने आहेत. त्यामुळे भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता त्या साधनांचा युक्त वापर केल्यास मदत होईल असे वाटते. देशातील किंवा स्थानिक पातळीतील असलेली संसाधने आपल्या आवश्यकतेनुसार वापरून ग्रामीण क्षेत्राला आत्मनिर्भर बनविता येईल. याच बरोबर नैसर्गिक संसाधने वापरत असताना युक्त वापर आवश्यक आहे. उत्पादनाकरिता किंवा उपभोगा करिता नैसर्गिक संसाधने वापरताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी मात्र घ्यायला पाहिजे.

४. **कृषी क्षेत्र** : भारत हा कृषिप्रधान देश असून जवळजवळ ७० टक्के लोकसंख्या या क्षेत्रात कार्यरत आहेत परंतु या क्षेत्रात पारंपारिक पद्धतीने शेती करण्याऐवजी वैज्ञानिक दृष्टिकोनातून किंवा व्यावसायिक दृष्टिकोनातून शेती केल्यास भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता सहज शक्य आहे. कृषी क्षेत्राच्या विकासाबरोबरच देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण तर करता येईलच परंतु शेतमाल निर्यात करून विदेशी मुद्रा अर्जित करता येतील. आजच्या घडीला Covid–19 महामारी च्या काळात लाकडाऊन असून सुद्धा कृषी विकासाचा दर पॉझिटिव आहे. त्यामुळे या क्षेत्राचे महत्त्व भारतीय अर्थव्यवस्थेत आहे. कृषी क्षेत्रात पायाभूत सुविधांचा विकास करून भारताला आत्मनिर्भर बनवण्याची संधी भारता जवळ आहे.

५. **सांस्कृतिक धरोहर** : भारतीय सभ्यता, संस्कृती, भाषा, लोककला, रितीरिवाज, पूर्वजांचे ज्ञान, अध्यात्मिक ज्ञान व भारतीय विद्या या उच्चकोटीच्या असून भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता त्याचा फायदा होईल असे वाटते.

६. **मानवी भांडवल** : मानवी भांडवल आत्मनिर्भर भारताकरिता एक संधी आहे. भारतातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे श्रम स्वस्त आहे. श्रमप्रधान तंत्राचा वापर करून आपल्याला आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करता येईल. देशाच्या आर्थिक विकासात आरोग्यसंपन्न नागरिक मानवी भांडवल याची निर्मिती करतात स्वस्थ व्यक्ती उद्योगधंदे किंवा कृषी किंवा सेवा क्षेत्राच्या विकासाकरिता योगदान देऊ शकतात.

७. **पर्यटन व्यवसाय** : आपल्या देशात नैसर्गिक पर्यटनाबरोबरच धार्मिक पर्यटनाला सुद्धा मोठ्या प्रमाणात चालना देऊन मोठ्या प्रमाणात विदेशी चलन मिळवता येते त्याचबरोबर या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध करता येतात त्यामुळे भारताला स्वावलंबी बनविण्याकरिता या क्षेत्रात मोठे योगदान असू शकते हे लक्षात घ्यायला पाहिजे.

८. **बाजारपेठ** : भारतीय बाजारपेठ मोठी आहे. या बाजारपेठेमध्ये मागणी मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे मोठ्या बाजारपेठेचे फायदे भारताला घेता येतात. भारतीय बाजारपेठ नियंत्रित करून देशाला आत्मनिर्भरते च्या

दिशेला नेता येईल परंतु त्याकरिता योग्य नियोजनाची गरज आहे. नेतृत्वाची गरज आहे.

भारताजवळ अशा अनेक अपॉर्च्युनिटी किंवा संधी असल्या तरी भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता भारतासमोर मोठी आव्हाने किंवा अडथळे आहेत.

**आत्मनिर्भर भारत : आव्हाने (चॅलेंजेस)**

**१. भांडवल निर्मिती** : भांडवलाची पर्याप्त मात्रा व दर्जा असल्याशिवाय देशाची व्यापक प्रमाणावर आर्थिक प्रगती होऊ शकत नाही. भांडवलाच्या कमतरतेमुळे उद्योग–व्यापार व कृषी क्षेत्राची प्रगती खुंटते. देशाला आत्मनिर्भर बनवायचे असेल तर भांडवलाची भूमिका लक्षात घेता भांडवल निर्मितीच्या दरात वाढ करणे आवश्यक आहे.

**२. मानवी भांडवल** : प्रो किंडलबर्गर च्या मते, देशाची लोकसंख्या व आकार, वृद्धीदर, विभिन्न व्यवसायांमध्ये वितरण, कार्यक्षमता या सर्व गोष्टी देशाच्या आर्थिक वृद्धी दरावर किंवा विकासावर परिणाम करीत असतात. त्यामुळे मानवी भांडवल याला आर्थिक विकासात महत्त्वाची भूमिका असते. भारताला स्वावलंबी बनायचे असेल तर मानवी भांडवलाचा विकास करणे आवश्यक आहे. आरोग्य विषयक सोयी, शैक्षणिक सोयी, अनेक प्रकारच्या सोयी सवलती, प्रशिक्षण व संशोधन केल्यास मानवी भांडवलाचा विकास होऊन देशाला विकासाकडे वाटचाल करता येईल. असे असले तरी मानवी भांडवलाचा विकास करणे हे मोठे आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेपुढे आहे. नवीन शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आलेले आहे ते मानवी भांडवल विकसित करण्यात कितपत साध्य करेल यावर भारताचे आत्मनिर्भरतेचे स्वप्न अवलंबून आहे.

**३. तांत्रिक प्रगती व नवप्रवर्तन** : तांत्रिक प्रगती आर्थिक वृद्धीचा महत्त्वाचा घटक मानला जातो. तांत्रिक प्रगतीमुळे नवउत्पादन तंत्राचा विकास किंवा नवप्रवर्तन होते त्यामुळे श्रम व भांडवल याच्या उत्पादकतेत वाढ होते परंतु भारतात तांत्रिक प्रगती मोठ्या प्रमाणात न झाल्यामुळे विकासाचा दर कमी आहे. विकासाचा दर वाढवायचा असेल आणि भारताला आत्मनिर्भर बनवायचे असेल तर तांत्रिक प्रगती करणे आवश्यक आहे. आपण हे आव्हान कितपत साध्य करतो त्यावर भारताचे स्वावलंबन अवलंबून आहे. योग्य नेतृत्व आणि योग्य तंत्रज्ञान असेल तर आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करणे सोपे असते परंतु भारतात योग्य नेतृत्व व योग्य तंत्रज्ञान मिळणे हे एक मोठे आव्हान आहे.

याच बरोबर स्थानिक संसाधनांचा व मानवीय संसाधनांचा योग्य प्रमाणात व योग्य दिशेने वापर करण्याकरिता देशात नवप्रवर्तन घडविणे आवश्यक आहे हे मोठे आव्हान भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आहे.

**४. उद्योजक व उपक्रम** : औद्योगिक विकासात उद्योजकांची किंवा उपक्रमाची भूमिका अतिशय महत्त्वाची असते. उपक्रमींना 'औद्योगिक जहाजाचा कप्तान' असे म्हणतात. नैसर्गिक संसाधने, श्रम, भांडवल या सर्वांचा योग्य पद्धतीने वापर करून आर्थिक विकास घडवून आणणारा उपक्रमी असतो. उपक्रमी नसेल तर देशातील मौल्यवान साधनसंपत्तीचा काहीच उपयोग होणार नाही. आपल्या देशात धाडसी उपक्रमींची संख्या फारशी नसल्यामुळे जलद आर्थिक विकास संभवत नाही. उपक्रमींना योग्य ती मदत दिल्यास व त्यांना प्रशिक्षित केल्यास देशाला आत्मनिर्भर करण्याकरिता फायद्याचे ठरेल.

**४. राष्ट्रीय चारित्र्य** : देशाच्या विकासाकरिता किंवा आत्मनिर्भर भारताकरिता देशातील लोकांचे राष्ट्रीय चारित्र्य उच्चकोटीचे असले पाहिजे. सरकारी कर्मचारी व लोकांची नीतिमत्ता शाबूत असली पाहिजे. लोकांच्या अंतकरणात श्रमप्रतिष्ठा, स्वाभिमान, देशप्रेम, समाज व राष्ट्र प्रती निष्ठा व आत्म जागृती असली पाहिजे. थोडक्यात, लोकांचे राष्ट्रीय चारित्र्य आदर्श असले पाहिजे. आज भारतीय लोकांमध्ये राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करण्याचे आव्हान आहे. जोपर्यंत लोकांमध्ये राष्ट्रीय चारित्र्याची निर्मिती होणार नाही तोपर्यंत देश स्वावलंबी होणार नाही.

**५. उत्पन्न व संपत्ती वाटपात समानता** : स्वावलंबनाचे फळे चाखण्याकरिता उत्पन्न व संपत्तीचे वाटप समानतेच्या न्यायाने व्हायला पाहिजे. आपल्या देशात वारसा हक्क मुळे संपत्तीचे विषम वितरण होत आहे. त्यामुळे विषमतेची दरी वाढत आहे. देशाला आत्मनिर्भर बनवताना या गोष्टींचा सुद्धा विचार करावा लागेल.

**६. जनतेचा सहभाग** : भारतात जनतेच्या सहभागाशिवाय नियोजन यशस्वी होत नाही. भारतात अनेक बाबतीत विविधता दिसून येते. भारताला स्वावलंबी बनवायचे असल्यास भारतीय जनतेचा सहभाग अतिशय महत्त्वाचा ठरतो. आत्मनिर्भरते करिता कोणतीही योजना कितीही चांगली असली तरी जनतेच्या सहभागाशिवाय ती यशस्वी होणे शक्य नाही म्हणून भारतातील लोकशाहीप्रधान देशात लोकांच्या सहभागानेच आत्मनिर्भर भारताची कल्पना माडता येईल. आत्मनिर्भर भारताची संकल्पना साकार करण्याकरिता जनतेचा सहभाग मिळवणे हे एक मोठे आव्हान आहे.

**७. प्रामाणिक व कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा** : भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता जे नियोजन केले जाते त्याची अंमलबजावणी प्रशासकीय यंत्रणा करतात. भारतात उच्च कोटीची प्रामाणिकता दिसून येत नसल्यामुळे प्रशासकीय

यंत्रणा अतिशय कार्यक्षम पणे कार्य करीत नाहीत. कार्यक्षम, प्रामाणिक व सक्षम अशी प्रशासकीय यंत्रणा उभी करणे भारतासमोरील आव्हाने.

**८. उच्चकोटीचे नेतृत्व** : भारतात लोकशाही असून अनेक राजकीय पक्ष अस्तित्वात आहेत. प्रत्येक राजकीय पक्षाचा हेतू किंवा उद्देश वेगवेगळा असतो. देशाला आत्मनिर्भर बनविण्याकरिता उच्चकोटीचे नेतृत्व गरजेचे आहे. लोकांमध्ये देशाभिमान जागविण्याचे कार्य देशातील नेतृत्व करीत असते. जोपर्यंत असे नेतृत्व भारताला लाभत नाही तोपर्यंत भारत स्वयंपूर्ण होणार नाही.

**९. पर्यावरण संरक्षणासह आर्थिक विकास** : आर्थिक विकासाच्या हव्यासापोटी पर्यावरणाचे संरक्षण होताना दिसून येत नाही. औद्योगीकरणा बरोबरच पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होत आहे असे दिसून येते. पर्यावरणासह आर्थिक विकास हे मोठे आव्हान भारतासमोर आहे.

**१०. ग्रामीण विकास** : भारतात शहरी विकासापेक्षा ग्रामीण विकास कमी होत असलेला दिसून येतो. ग्रामीण क्षेत्रात शेती हा मुख्य व्यवसाय असून शेती क्षेत्राच्या विकासाकरिता प्रयत्न करण्याचे मोठे आव्हान देशातील नेतृत्व पुढे आहे. जोपर्यंत शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होत नाही तो पर्यंत अन्नधान्य व कच्चामाल मुबलक प्रमाणात मिळणार नाही. ग्रामीण क्षेत्राला आत्मनिर्भर करण्याचे आव्हान भारतासमोर आहे.

**११. महिला सक्षमीकरण** : भारतात महिला सक्षमीकरणा करिता नियोजन काळात अनेक योजना राबविण्यात आल्यात परंतु अजूनही महिलांच्या बाबतीत आर्थिक, सामाजिक, राजकीय व संस्कृतिक सक्षमीकरण झाले आहे म्हणता येत नाही. लोकसंख्येच्या ४५ ते ५० टक्के लोकसंख्या महिलांची आहे. त्यामुळे भारताला आत्मनिर्भर बनवायचे असेल तर आर्थिक विकासात महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे महिला सक्षमीकरणाचे आव्हान भारतापुढे आहे.

**१२. शैक्षणिक धोरण** : भारताला आत्मनिर्भर बनविण्याकरिता योग्य असे शैक्षणिक धोरण असायला पाहिजे. आजची शिक्षण पद्धती भारताला स्वावलंबी बनवून देण्याकरिता सक्षम आहे असे वाटत नाही. या दृष्टिकोनातून होऊ घातलेल्या नवीन शैक्षणिक धोरणात शैक्षणिक क्षेत्रात बराच बदल घडून येणार आहे. जर योग्य दिशेने तो बदल घडून आला तरच भारताला आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने वाटचाल करता येईल.

**१३. समाजव्यवस्था** : आपल्या समाजात अजून सुद्धा जात, धर्म, लिंग याबाबत भेदभाव केला जातो आणि ही गोष्ट आपल्या विकासात बाधा आणणारी आहे. जर भारताला आत्मनिर्भर बनवायचे असेल तर जात, धर्म व लिंग याबाबत भेदभाव न करता समान रूपाने आपल्या व देशाच्या आर्थिक विकासात सामूहिक प्रयत्न करायला पाहिजे. जर प्रत्येक व्यक्ती स्वत:ला आर्थिक बाबतीत मजबूत करण्याचा प्रयत्न करेल तरच देश आत्मनिर्भर बनेल.

जोपर्यंत भारतासमोर असलेली अशी आव्हाने किंवा समस्या दूर होणार नाहीत तोपर्यंत भारत स्वावलंबी किंवा आत्मनिर्भर होणार नाही.

**संदर्भ** :

https://www.investindia.gov.in/atmanirbhar-bharat-abhiyaan
https://en.wikipedia.org/wiki/Atmanirbhar_Bharat
https://www.ibef.org/blogs/self-reliant-india-movement-an-opportunity
https://www.hindustantimes.com/india-news/technology-mainstay-of-making-india-self-reliant-pm-modi-101646248205276.html
https://aatmanirbharbharat.mygov.in/